FORM-1A  0058169  N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि, पहिली खबर क्र. FIR No. २९/२४ वर्ष Year २०२४, दिनांक Date ०५/०७/२०२४
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शुक्रवार, तारीख पासून Date from ०४/०७/२४ वेळ Time १६:००, तारीख पर्यंत Date to ०४/०७/२४ वेळ Time २१:३०

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00

   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ०४/०७/२०२४, वेळ Time ........

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०३/२०२४, तारीख Date ०५/०७/२४ वेळ Time ०६:२०
4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी / बीट / दरक्षेत्र नाव व क्र.

   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ Chouki / Beat / O.P. Name and No. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, टिळकनगर पोलीस ठाणे यांची केबिन,

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name टिळकनगर पोलीस ठाणे, मुंबई, ठिकाण क्र. No. if any ........, गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road ........

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name श्री० जोगिंदरलाल  (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name महेश खोसला

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४९ वर्षे  (d) राष्ट्रीयत्व Nationality ........ फोन नं. Phone No. ७४०६२२४९५४

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. —, दिल्याचा दिनांक Date of Issue —, दिल्याचे ठिकाण Place of Issue — (f) व्यवसाय Occupation व्यावसायिक

   (g) धर्म Religion ........, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........

   (h) पत्ता Address : फ्लॅट नं. ५०५, मारुती दर्शन, सेक्टर ६, प्लॉट नं. १९, सेक्टर - ६, (गल्ली Ward, House/Name No., Phone/M. No., PAN No., Card No.)

   रस्त्याचे नाव Road एमएनआर स्कूलजवळ, कामोठे, जि. रायगड (जवळचे ओळख ठिकाण Nearest identifiable place, गाव Village), पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

   तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........
7. माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   दिपक वामन बागुल, ४६ वर्षे, धंदा - नोकरी (वपोनि टिळकनगर पो ठाणे, मुं.), राही - पाशिनाते सोसायटी, खो क्र ६०१, ६ वा माळा, वरळी पोलीस वसाहत, वरळी, मुं ३०.

Y.P.P.–3,200 Bk.–(25×6=150 Lvs)–3-2021–PA3–(K) 347

फिर्यादी श्री० जोगिंदरलाल महेश खोसला, वय ४७ वर्षे, धंदा- बाईकशोरूम, राही- फ्लॅट नं ५०५, मारुती दर्शन, सीएचएस. प्लॉट नं. १९, सेक्टर-६, एमएनआर शाळेजवळ, कामोठे, जि. रायगड यांचा स्वतंत्र पानावर नोंद केलेला जबाब हीच सदर गुन्ह्याची प्रथम खबर अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे

समक्ष

(गणेश सूर्यवंशी)
पोलिस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई.

दि. ०९/०७/२०२४

## फिर्याद

श्री. जोगींदरलाल महेश खोसला, वय ४१ वर्ष, व्यवसाय : साई मोटर्स टु व्हिलर डिलर, राठी : फ्लॅट नं. ५०५, मारुती दर्शन, सीएचएस प्लॉट नं. १९ सेक्टर ६, एमएनआर शाळेजवळ, कामोठे ता. जि. रायगड ४१०२०९, मोबाईल क्र. ७५०६२२५१५५

०००००

मी वरील प्रमाणे असुन, उपरोक्त नमुद पत्त्यावर माझे पत्नी व दोन मुलींसह रहावयास आहे. माझा साई मोटर्स (टु व्हिलर) डिलरचा व्यवसाय करत असुन, त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझा व माझे कुटूंबियांचा उदरनिर्वाह चालतो.

मला श्री. आरीफ यांनी ओम साई को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुंबई, दुकान नं. १४, शिवधाम, शिव कृपा, बिल्डींग सत्यानगर, भगवती हॉटेल जवळ, बोरीवली प, मुंबई ९२ या सोसायटीमध्ये पैसे भरण्याचा एक प्लॅन सांगुन, सदर पैसे भरल्यानंतर तात्काळ तुम्हाला दुप्पट पैसे मिळतील असे सांगीतले. त्यानंतर मी दि. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी आरीफ याने मला बोरीवली येथे ओमसाई को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुंबई च्या ऑफिसमध्ये बोलावुन सदर सोसायटीचे चेअरमन श्रीमती रजनी राजन देशपांडे यांची ओळख करुन दिली. त्यावेळी श्रीमती रजनी राजन देशपांडे यांनी मला सांगीतले की, तुम्ही कमीत कमी २५ लाख रुपये भरणा करा, तुम्हाला २४ तासाच्या आत पैसे डबल करुन मिळतील. सदर रक्कमेचे चेक ओमसाई को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुंबई किंवा गजानन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुंबई या सोसायटीचे मिळतील असे मला सांगीतले.

त्यानंतर मी व माझे पत्नी इंदू असे मिळून दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी रु. २७,५०,०००/– रोख रुपये सोबत घेवुन सोसायटीच्या बोरीवली येथील वरील नमुद पत्त्यावरील कार्यालयात गेलो. सदर कार्यालयात श्रीमती. रजनी राजन देशपांडे सोबत अजीज फारुख मो. नं. ७७१५९०२४७० व त्यांच्या सोबत स्टाफचे ४ कर्मचारी हजर होते. त्यांच्यासमक्ष मी सोबत नेलेली रोख रुपये २७,५०,०००/– रक्कम मी श्रीमती रजनी देशपांडे यांच्या हातात दिली. त्यानंतर मला श्रीमती देशपांडे हीने दोन तास बसण्यास सांगुन तुम्हाला तात्काळ दुप्पट पैसे येतील असे सांगीतले. थोडया वेळानंतर मला टीएजी हॉटेल प्रा. लि. या नावाच्या बॅक खात्यावरुन रु.४,७१,५५५/–, रु. ४,००,०००/– व रु. १,००,०००/– रुपये आरटीजीएस पद्धतीने माझी पत्नी सौ. इंदु यांचे नावे असलेला एचडीएफसी, उलवे शाखेच्या खाते क्र. ५०२०००६८२३४६९१ वर जमा केली. उर्वरीत रक्कमेबाबत विचारणा केली असता, तिने आम्हाला, पैसे पाठविण्याऱ्या बॅकेचे सर्व्हर डाऊन असल्याचे सांगीतले.

साधारण एक महीन्यानंतर, श्रीमती रजनी देशपांडे हीने घाटकोपर येथे गजानन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुंबई, एम/५४/४, जीएम रोड समोर, अमबाजी बिल्डींग, चेंबुर प, मुंबई ८९ येथे त्यांनी नविन ऑफिस चालु केले असल्याचे समजले. त्यानंतर मी व माझी पत्नी असे मिळून दि. ०८/०४/२०२४ रोजी सदर कार्यालयात गेलो असता, त्यावेळी श्रीम. रजनी देशपांडे व त्यांचे सहाकारी यांच्याकडे मी व माझी पत्नीने उर्वरीत पैशांबाबत मागणी केली असता, त्यांनी आम्हास दि. १५/०४/२०२४ व दि. १६/०४/२०२४ रोजी पैसे घेण्यासाठी येण्यास सांगीतले.

दि. १६/०४/२०२४ रोजी मी व माझी पत्नी सौ. इदु असे घाटकोपर येथे सोसायटीच्या कार्यालयात गेलो, त्यावेळी श्रीमती रजनी देशपांडे हया सोसायटीच्या कार्यालयात हजर नव्हत्या. त्यानंतर मला मोबाईल क्र. ९३७२४५६४३५ यावरुन फोन आला व समोरील व्यक्ती बोलला की, **"मी टिळक नगर पोलीस स्टेशनवरुन बोलत आहे, तुम्ही टिळक नगर पोलीस स्टेशनला"** या असे सांगीतले. मला पोलीस स्टेशनला बोलावले म्हणुन आम्ही टिळक नगर पोलीस स्टेशनला गेलो.

स्वागतकक्ष येथील कर्मचारी यांनी मला पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिपक बागुल यांच्या कॅबिनमध्ये घेवुन गेले. त्यावेळी त्यांनी मला सांगीतले की, **"तुमच्याविरुद्ध एका महीलेने तकार केली आहे, त्यासाठी तुम्हाला बोलाविले आहे"**. त्यावेळी मी त्यांना माझेकडुन सदर महीलेने घेतलेले पैसे डबल करुन देते, परंतु तिने पैसे दिले नाही वगैरे सर्व हकीकत सांगीतली असता, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिपक बागुल यांनी माझी पत्नी सौ. इंदु हिस बाहेर थांबण्यास सांगीतले. सदर बाब ही दिवाणी स्वरुपाची असल्याने मी तुमची तकार घेणार नाही. परंतु त्या महीलेने **"तुमच्या विरुद्ध शिवीगाळ केल्याबाबत तकार दिल्यास ती मी नोंदवुन घेईल"**. असे सांगून त्यांनी मला **"तुमचा पैशांचा व्यवहार आहे, मी तिच्याकडुन तुझे पैसे काढुन देतो, तुला २५ टक्के रक्कम मला द्यावी लागेल"**. असे मला सांगितले.

त्यानंतर मी वेळोवेळी साधारण एक महिन्यानंतर श्रीमती रजनी देशपांडे यांना संपर्क करुन पैशांची मागणी केली असता, श्रीमती रजनी देशपांडे हिच्या खात्यावरुन माझी पत्नी सौ. इंदु हिच्या हरीका मोटर्स या खात्यावर दि. ०३/०५/२०२४ रोजी रु. १,५१,०००/–, दि. ११/०५/२०२४ रोजी रु. ९५,०००/–, रु. १,००,०००/–, दि. १५/०५/२०२४ रोजी रु. २,००,०००/–, रु. २,००,०००/– व दि. १८/०६/२०२४ रोजी रु. १,५०,०००/– असे एकुण ८,९६,०००/– रुपये आरटीजीसव्दारे जमा केले आहेत. त्यानंतर आम्ही श्रीमती रजनी देशपांडे हिच्याकडे उर्वरीत पैशांसाठी फोन केला असता, तिने वेगवेगळे बहाने सांगुन पैसे देण्यास टाळाटाळ करत आहे.

दि. ०३/०७/२०२४ रोजी मी व माझी पत्नी असे श्रीमती रजनी देशपांडे यांच्या चेंबूर येथील कार्यालयात गेलो जावून, आमच्या उर्वरीत पैशांबाबत विचारणा केली असता, तिने आम्हाला **"मी तुम्हाला दि. १२/०७/२०२४ रोजी टिळक नगर पोलीस स्टेशनच्या साहेबांसमक्ष देईल"**. असे सांगीतले. त्यावेळी मी लागलीच वपोनि श्री. दिपक बागुल साहेब यांना फोन केला असता, त्यांनी सांगीतले की, **"तुला रु. ३,५०,०००/– रुपये मिळाले, तरी तु आम्हाला कळविले नाही"**. त्यानंतर मी व माझी पत्नी असे सायंकाळी ०५.१५ वा. चे सुमारास पोलीस स्टेशनला साहेबांना भेटायला गेला असता, त्यावेळी साहेबांनी मला विचारले की, **"आतापावेतो तुला किती पैसे आले"** तेव्हा मी त्यांना सांगीतले की "मला आतापावेतो रु. ८,००,०००/– पर्यंत रक्कम मिळाली आहे." त्यावर वपोनि दिपक बागुल साहेब यांनी मला, **"तु जोपर्यंत १,००,०००/– रुपये देत नाही, तोपर्यंत मी श्रीमती रजनी देशपांडे हिला बोलावणार नाही, व उर्वरीत पैसे तुला मिळणार नाही"** असे सांगीतले.

मला श्री. दिपक वामन बागूल वरिष्ठ पोलीस निरीक्षक, टिळक नगर पोलीस ठाणे यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांचेविरूध्द दि. ०५/०७/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई कार्यालयात येवून तेथील वरिष्ठ अधिकारी यांना भेटुन माझी तक्रार सांगितली. त्याप्रमाणे त्यांनी माझे तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता तपासी अधिकारी म्हणून पो.नि गणेश सुर्यवंशी व पर्यवेक्षक अधिकारी म्हणून स.पो.आ. बाबर यांची नेमणुक केली. तसेच मी आणलेला तक्रार अर्ज व त्यासोबत कागदपत्रे तपासी अधिकारी यांना दिला असता, त्यांनी व पंचानी समक्ष म्हणून सहया केल्या व तो अर्ज व कागदपत्रे पूढील कारवाईकरीता ताब्यात घेतली.

मी केलेल्या तक्रारीनुसार दि. ०५/०७/२०२४ रोजी पो.नि सुर्यवंशी यांनी पो.ह यादव यांच्या मदतीने डीव्हीआर मशीन चालू करुन माझे शर्टच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व शासकीय पंच असे माझे आणलेली टोयाटो कंपनीची मोटार कार क्र. एमएच–४६–एक्स–०२५१ हिने टिळक नगर पोलीस ठाणे, मुंबई येथे पडताळणी करीता पाठविले असता, त्यावेळी माझे व लोकसेवक यांच्यामधील झालेले संभाषण **"मै छे बजे निकलूंगा बाहर... अभी है क्या मिलो... हा आ जाओ... नही... तुम ही बोलने का...मॅडम (अस्पष्ट आवाज) कडी लावा.... ओ गाडी लावा... दो मिनिट ह मेरे को जाना है...जो बोला मै (अस्पष्ट आवाज)...बस देखो टाईम नही अभी... मै निकल रहा हू... हा बोलो...हा बोलीये...कल शाम को पॉच बजे...असे संभाषण झाले**.

दि. ०८/०७/२०२४ रोजी पो.नि सुर्यवंशी यांनी पो.ह यादव यांच्या मदतीने डीव्हीआर मशीन चालू करुन माझे शर्टच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी व शासकीय पंच असे माझे मोटार गाडीने टिळक नगर पोलीस ठाणे, मुंबई येथे पडताळणी करीता पाठविले असता, त्यावेळी माझे व लोकसेवक यांच्यामधील झालेले संभाषणापैकी दिपक बागुल यांचे **"मेरा...,चालीस..., अ..., थर्टी फाय...,थर्टी फाय...,मोबाईल किधर है तुम्हारा... ,नही..., हा....,निकाल के लेके आओ..., असे संभाषण झाले**. त्यानंतर मी व पंच पोलीस पथक ज्या ठिकाणी थांबले होते त्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर पो.नि सुर्यवंशी यांनी पो.ह यादव यांच्या मदतीने मला लावलेला डि.व्हि.आर काढून स्वतःच्या ताब्यात घेतला. **पो.नि. सुर्यवंशी व स.पो.आ बाबर यांनी डि.व्हि.आर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून त्यामध्ये लाचेची मागणी झाल्याची खात्री झाली. त्यावेळी पो.नि सुर्यवंशी यांनी मागणी केलेल्या लाचेची रक्कमेबाबत माझेकडे विचारणा केली असता, माझेकडे रु. २०,०००/– इतकी रक्कम होती. उर्वरित रु. १५,०००/– इतकी रक्कम ए.टी.एम मधून काढून आणून पो.नि. सुर्यवंशी यांच्या ताब्यात दिली.**

त्यानंतर पो.नि सुर्यवंशी यांनी मला, पंच व पोलीस पथकास सापळा कारवाईच्या दृष्टीने घ्यावयाच्या खबरदारीच्या सुचना दिल्या व लाचेच्या रक्कमेस ॲन्थ्रासीन पावडर लावून माझे ताब्यात दिली व त्यानंतर पो.नि सुर्यवंशी यांनी पो.ह यादव यांच्या मदतीने डीव्हिआर मशीन चालू करुन माझे शर्टच्या आतील बनियनला लावला. त्यानंतर मी, पोलीस पथक व पंच असे टिळक नगर, पोलीस ठाणे, मुंबई येथे जाण्याकरीता रवाना झालो. त्यानंतर मी व पंच टिळक नगर पोलीस ठाणे, मुंबई मध्ये जावून श्री. दिपक बागूल साहेबांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मला एकटयालाच कॅबिनमध्ये बोलवून माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यानुसार मी त्यांना माझे

ताब्यातील अॅन्थ्रासीन पावडर लावलेली रू. ३५,०००/— लाचेची रक्कम लोकसेवक श्री. दिपक बागूल यांनी त्यांच्या टेबल्याचे डाव्या बाजूचे ड्राव्हर उघडून लाचेची रक्कम अंगूलीमुद्रेने इशारा करुन ड्राव्हरमध्ये ठेवण्यास खूणवले. त्याप्रमाणे मी पॅन्टच्या उजव्या मांडीजवळील खिशातून लाचेची रक्कम काढून ड्राव्हरमध्ये ठेवली. त्यानंतर मी लाचेची रक्कम ठेवून कॅबिनच्या बाहेर येवून मला सुचना केल्या त्याप्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत नियोजित इशारा केला. सदर रक्कम श्री. दिपक बागूल हे टिळक नगर पोलीस ठाण्याच्या बाजूस दबा धरून बसलेले पोलीस पथकाने श्री दिपक बागूल यांना ताब्यात घेतले. सदरवेळी आमचे मधील संभाषण मला लावण्यात आलेल्या डिव्हीआर मधील मायक्रो एसडी कार्डमध्ये ध्वनीमुद्रित झालेले आहे.

श्री. दिपक बागूल यांना ताब्यात घेवून लाप्रवि मुंबई कार्यालयास पुढील कारवाईकरीता रवाना होत असलेबाबत टिळक नगर पोलीस ठाणे, मुंबई येथील रात्रपाळी कर्तव्यावरील असलेले स.पो.नि गवळी यांना केलेल्या कार्यावाहीबाबत माहिती देवून सदरची नोंद ठाणे दैनंदिनीमध्ये घेण्यात आली. लोकसेवक यांना पुढील कारवाईकरीता शासकीय वाहनाने लाप्रवि, वरळी, मुंबई कार्यालयास आलो.

तरी लोकसेवक श्री. दिपक वामन बागूल वय ५६ वर्षे, राठी : परिजात सोसायटी, खोली क्र. ६०१, ६ वा माळा, वरळी पोलीस वसाहत, वरळी, मुंबई यांनी माझेकडे श्रीमती रजनी देशपांडे यांनी घेतलेले पैसे परत मिळवून देण्याकरीता रु. १,००,०००/— इतकी रक्कमेच्या लाचेची मागणी करुन तडजोडीअंती बेकायदेशीर काम पार पाडल्याबद्दल प्रलोभन म्हणून रु. ३५,०००/— रक्कमेची लाच स्विकारली म्हणून माझी लोकसेवकाविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील जबाब मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून, तो मी वाचून पाहिला असता, तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

( गणेश सुर्यवंशी ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

15

प्रत,
Cop.
Attac

ER OF PO ... MUMBAI ... ION BU

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........तात्काळ........

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..................................................................................................

..................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..............................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) ..............................

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमूद ता वे व ठिकाणी यातील फि" यांच्या ओळखीच्या महिला नामे श्रीमती रजनी देशपांडे हिने फि कडून २० लाख ५० हजार रु घेतले होते. त्यापैकी काही रक्कम श्रीमती रजनी देशपांडे यांनी फि"ला दिली होती. व उर्वरित रक्कम देण्यासाठी त्या टाळाटाळ करीत होत्या. श्रीमती देशपांडे हिने फि विरुध्द टिळकनगर पो. ठाणे येथे तक्रार देण्यासाठी गेल्या असता यातील आलोसे दिपक वामन बागुल, वपोनि. टिळकनगर पो. ठाणे, मुंबई यांनी रजनी देशपांडे यांचेकडून उर्वरित पैसे मिळवून देण्याकरीता फि" कडे २ लाख रु लाचेची मागणी केली व तडजोडीअंती दि. ८/७/२४ रोजी फिर्यादीकडून ३५,०००/- रु स्विकारताना आलोसे यांना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून नमूद गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक, गणेश सुर्यवंशी, लाप्रवि मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .............., जिल्हा .............., राज्य ..............

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ...............................................

District.................................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in charge, Police Station

संपूर्ण नाव Name ....गणेश सुर्यवंशी.......

पदनाम Rank.......पोलीस निरीक्षक.......

तपासिक अं. चा कोड क्र. ....ला.प्र.वि. मुंबई.

Posting

Code No. of I. O. .............................................

INSPECTOR OF POLICE ANTI CORRUPTION BUREAU MUMBAI सत्यमेव जयते

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख.......................

1. Date and time of submitted to the Court.......................

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**